सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**

एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,

E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. १४** **दिनांक :- २७/०३/२०२४**

# पैशांसाठी अपहरण करुन लहान मुलाची केली हत्या, आरोतांना ठाणे ग्रामीण पोलीसांनी केले अटक

दिनांक २५/०३/२०२३ रोजी रात्रौ २०.३० वा. चे दरम्यान फिर्यादी यांचा १२ वर्षाचा मुलासह नमाज पडण्यासाठी गेले असता त्यांचे नमाज पडुन झाल्यानंतर बाहेर आले. तेव्हा त्यांचा मुलगा त्यांना दिसला नाही. त्यांना मुलगा इबादचे मुलांमध्ये खेळत असेल असे गृहीत धरुन ते घरी गेले घरी गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, मुलगा मिळुन येत नाही त्यानंतर २२.३० वा. चे सुमारास फिर्यादीला अज्ञात क्रमांकावरुन फोन आला “तेरा बच्चा मेरे कब्जेमे है, पैसे का बंदोबस्त कर बच्चा मिलेगा” असे बोलुन फोन कट झाला तेव्हा फिर्यादीने कुळगांव पोलीस ठाण्यात येवुन अज्ञात आरोपीता विरुध्द तक्रार दिली त्याबाबत कुळगांव पोलीस ठाणे येथे गु. रजि क्र. भादविसह कलम ३६४(अ), १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयांचे गार्भिर्य लक्षात घेवुन मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली घाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, श्री. जगदीस शिंदे उप विभागीय पोलीस अधिकारी, मुरबाड यांनी तपासाकामी स्थानिक गुन्हे शाखा व कुळगांव पोलीस ठाणेचे वेग-वेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले. वरिष्ठांनी केलेल्या मार्गदर्शनपर सुचना नुसार श्री. सुरेश मनोरे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा व त्यांचे पथक सह सपोनि/गोविंद पाटील, प्रभारी अधिकारी, कुळगांव पोलीस ठाणे यांचे पथकांने तांत्रिक विश्लेषनाच्या साहयाने आरोपीत हे गोरेगांव येथील रहीवाशी असल्याचे निष्पन्न केले व तद्नंतर सदर पथकाने आपले सर्व तपास यंत्रणा, गुप्त बातमीदाराच्या मदतीने एकुण ०३ आरोपीतांना अटक करुन पुढील तपासात आरोपीतांन सदर मुलांची हत्या केल्याचे निष्पन्न झाले.

सदरचा गुन्हां मा. पोलीस अधीक्षक, श्री. डी. एस. स्वामी , मा. अपर पोलीस अधीक्षक, श्रीमती दिपाली धाटे तसेच श्री. जगदीस शिंदे उप विभागीय पोलीस अधिकारी, मुरबाड यांनी केलेल्या मार्गदर्शनपर सुचनेचे अनुशंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश मनोरे, सपोनि/पोवार, पो.उप निरी./महेश कदम, पो. उप निरी./सागर पाटील, पोहवा/१५४२ उमेश ठाकरे, पोहवा/२६७ हनुमान गायकर, पोहवा/४८८ सुहास सोनावणे, पो.हवा/७७९ सतीष कोळी, पोहवा/२८४२ विभुते, पोहवा/२८१७ यतिन चाळके, पोशि/२०४५ रवि राय, पोशि/४४१७ निखिल वेखंडे, पोशि/१४६६ परदेशी (चालक) त्यांचे सह कुळगांव पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी सपोनि/गोविंद पाटील, पोहवा/२८२० बाबु पवार, पोहवा/२७७८ किरण खडताळे, पोशि/२०८६ राहुल दाभाडे, पोशि/३४३५ आनंता पाटील, कुळगांव पोलीस ठाणे यांचे पथकांने काही तासातच कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगिरी करुन गुन्हा उघड केला असुन सदर गुन्हयांचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक/गोविंद पाटील, प्रभारी अधिकारी, कुळगांव पोलीस ठाणे हे करीत आहे.

**************************************************************************